# विश्वकर्मा युनिव्हर्सिटी-झेन्सर टेक्नॉलॉजीमध्ये करार

पुणे, ता. १६ : विश्वकर्मा इन्स्टिट्यूट आणि विश्वकर्मा युनिव्हर्सिटीने 'गेमिंग अनुभव आणि शिक्षण केंद्र' स्थापन करण्यासाठी झेन्सर टेक्नॉलॉजीसमवेत सामंजस्य करार केला आहे. या करारामुळे जागतिक दर्जाचे गेमिंग केंद्र स्थापन करण्यास मदत होणार आहे.

स्टार्टअप्सला प्रोत्साहन देणे, गेम क्षेत्रातील विकास आणि संशोधनाला प्रोत्साहन देणे, उद्योगात यशस्वी होण्यासाठी कुशल गेम डेव्हलपर्सची निर्मिती करणे, या उद्देशांसाठी हा करार करण्यात आला आहे. मार्क विलेट, हेड ऑफ गेम्स पोर्टफोलिओ स्टुडिओ आणि विवेक कुलकर्णी यांच्या नेतृत्वात झेन्सरच्या प्रतिनिधींनी विश्वकर्मा युनिव्हर्सिटीच्या प्रमुखांशी चर्चा केली. या वेळी सामंजस्य करारावर संबंधितांनी स्वाक्षरी केली. या वेळी विद्यापीठाचे कुलपती डॉ. सिद्धार्थ जबडे, विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. विवेक देशपांडे, इन्स्टिट्यूटचे कॉर्पोरेट रिलेशन्सचे संचालक डॉ. अतुल कुलकर्णी सहभागी होते.



पुणे : विश्वकर्मा युनिव्हर्सिटीने 'गेमिंग अनुभव आणि शिक्षण केंद्र' स्थापन करण्यासाठी झेन्सर टेक्नॉलॉजीसमवेत सामंजस्य करार केला.